# डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर.

दिनांक : २६/११/२०२०

## संविधान दिवस समारोह

## अहवाल

डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर येथे प्राचार्या डॉ. श्रीमती. बी. ए. मेहेरे यांच्या अध्यक्षतेखाली संविधान दिवस समारोह साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरूवातीस भारतीय घटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन सामुहीक पद्धतीने महाविद्यालयाच्या पटांगणावर करण्यता आले. याप्रसंगी प्राचार्यांनी भारतीय राज्यघटनेच्या वैशिष्टयांवर उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील NSS तसेच NCC चे विद्यार्थी प्रामुख्याने यावेळेस उपस्थित होते. महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी हात उंचावून प्रास्ताविकेचे सामुहीक वाचन केले तसेच राज्यघटनेच्या वैशिष्टयपुर्ण गुणांवर घोषणा देण्यात आल्या.

..............................................*****..............................................


OFFICE






OFFICE